

२

# ।। उर्ध्वं गच्छन्ति सत्त्वस्था ।।

**उर्ध्वं गच्छन्ति सत्त्वस्था मध्ये तिष्ठन्ति राजसा।**
**जघन्यगुणवृत्तीस्था अधो गच्छन्ति तामसा।।१८।।**

सत्वगुणी उच्च स्थितीला जातात. रजोगुणी मध्यस्थितीत लोंबकळतात. तमोगुणी अधोगतीला जातात.

**– श्रीमद् ज्ञानेश्वरी –**

**तैसे सत्त्वाचेनि नटनाचे। असणे जाणे जयांचे।**
**ते तनुत्यागी स्वर्गींचे। राय होती।।२७१।।**

**इयाचिपरी रजे। जिही का जीजे मरिजे।**
**तिही मनुष्य होईजे। मृत्युलोकी।।२७२।।**

**तेथ सुखदु:खाचे खिचटे। जेविजे एकेचि ताटे।**
**जेथ इये मरणवाटे। पडिले नुठी।।२७३।।**

**आणि तयाचि स्थिती तमी। जे वाढोनि निमती भोगक्षमी।**
**ते घेती नरकभूमी। मूळपत्र।।२७४।।**



**एवं वस्तूचिया सत्ता। त्रिगुणाशी पंडूसुता।**
**दाविली सकारणता। आघवीचि।।२७५।।**

**– श्रीमद् ज्ञानेश्वरी, अध्याय १४ वा**

उपस्थित सर्व संतसज्जन भक्तश्रेष्ठांना ह. भ. प. दिनकरचे सप्रेम नमस्कार. या श्रीमद् गीता ज्ञानेश्वरीतील चौदाव्या अध्यायातील अठरावा श्लोक व त्या श्लोकावरील माऊली ज्ञानेश्वर महाराज यांच्या भाष्यामधील ओवी क्र. २७१ ते २७५ अशा पाच ओव्या मी आताच आपणासमोर सादर केल्या आणि हाच आपल्या आजच्या प्रवचनसेवेचा विषय आहे. वारणावतीच्या सामुदायिक पारायण सोहळ्याचे हे पंचविसावे वर्ष – म्हणजेच रौप्यमहोत्सवी वर्ष आहे आणि आजचा दिवस गोकुळाष्टमीचा दिवस आहे.

अशा या अत्यंत पवित्र दिवशी म्हणजे परमेश्वर श्रीहरीरूपाने पृथ्वीवर अवतरल्याच्या दिवशी प्रवचन सेवेचे भाग्य मला लाभले आहे. परमेश्वराचे पूर्णावतार भगवान श्रीकृष्णांनी कुरुक्षेत्राच्या रणांगणावर अर्जुनाच्या निमित्ताने अखिल मानवजातीला ज्या दिव्य ज्ञानाचा उपदेश केला, ते दिव्य ज्ञान म्हणजे जगद्गुरू व्यास महर्षिंनी ग्रंथित करून ठेवलेली श्रीमद् भगवद्गीता होय. ते संस्कृत या देववाणीतील अतिगूढ–दिव्य ज्ञान सर्व जिवांच्या उद्धारासाठी सुगम करून मराठीत सांगण्यासाठी पुन्हा ज्ञानेश्वर माऊलींच्या रूपाने भगवंत अवतरले. अजोड दिव्य ग्रंथ श्रीमद् ज्ञानेश्वरी त्यांनी स्वमुखाने प्रगट केला. सकल जनास परमार्थ सोपा झाला. जिवांच्या उद्धारासाठी भगवंतांनी सांगितलेल्या दिव्य ज्ञानापैकी चौदाव्या अध्यायातील अठरावा श्लोक आणि त्यावरील निवडलेल्या पाच ओव्यांमधून प्रकटलेल्या दिव्यभव्य ज्ञानाचे विवेचन आता आपण करूया.

तर भक्तहो, चौदाव्या श्लोकात भगवंतांनी अगदी सरळ सांगितले की, सत्त्वगुणी 'वर' जातात, रजोगुणी मधेच लोंबकळतात. तमोगुणी अधोगतीला जातात. उच्च म्हणजे स्वर्गलोक, मध्यलोक म्हणजे मनुष्यलोक आणि अधोलोक म्हणजे पशुपक्षादि योनी. या श्लोकात जिवांच्या मृत्युपश्चात गतीचा निर्देश करण्यात आला आहे.

श्रीमद्भगवद्गीतेमध्ये भगवंतांनी जे पराकोटीचे दिव्य ज्ञान सांगितले आहे त्यापैकी चौदाव्या अध्यायात त्यांनी प्रकृतीच्या तीन गुणांचा उहापोह केला आहे. पाचव्या श्लोकापासून ते सतराव्या श्लोकापर्यंत त्रिगुण कोणते, ते कसे कमी जास्त होतात, त्यांचे परिणाम काय होतात हे वेगवेगळे सांगून या अठराव्या एकाच श्लोकात त्रिगुणांच्या परिणामांचा समावेश केला आहे.

सत्त्व, रज आणि तम हे प्रकृतीचे तीन गुण आहेत. दृश्यादृश्य जगत या तीन गुणांनी बद्ध असते. गुणातीत अवस्था ज्यावेळी प्राप्त होते तेव्हाच मूळ मायेपर्यंत पोहचता येते आणि भगवंतांच्या कृपेने त्यांच्यापर्यंत पोहचता येते.

यासाठी गुण म्हणजे म्हणजे काय? ते कसे निर्माण होतात? कसे वाढतात? कोणत्या गुणाची वृद्धी केली पाहिजे? ती कशी आणि का? आणि गुणातीत होऊन भगवंतामध्ये कसे विलीन होता येईल? यासाठी गुणांचा उहापोह असलेला हा चौदावा अध्याय अतिशय महत्त्वपूर्ण आहे.

सत्त्व, रज आणि तम या तीन गुणांच्या प्रभावामुळे जीव वेगवेगळ्या स्थितीत राहून अंती वेगवेगळ्या गतीस प्राप्त होतो. गुणातीत होणे हे सहजसोपे नसले तरी ते अशक्य मात्र नाही. स्वर्ग, पृथ्वी आणि पाताळ या तिन्ही लोकांत या त्रिगुणांपासून कोणीही सुटले नाही. हे त्रिगुण निर्माण झालेच कसे?

याचे उत्तर सोपे आहे! जेव्हा मूळ माया निर्माण झाली तेव्हाच त्रिगुणही निर्माण झाले, हे होय. मूळ परब्रह्म हे एकच एक, नित्यमुक्त, निर्विकार, अक्रिय, अखंड होते. त्यास असणेपणाची जाणीव झाली. हाच आदिसंकल्प होय. आदि अंतरहित सर्वशक्तिमान परब्रम्हास 'अहं'चे स्फुरण होताच निर्माण होणाऱ्या मूळ मायेस दोन अभिन्न अंगे असतात. ती म्हणजे शुद्ध व संपूर्ण ज्ञानमय जाणीव व दुसरे अंग म्हणजे संपूर्ण शक्तीगर्भ सामर्थ्य हे होय.

या मूळ मायेच्या शक्तिगर्भ अंगातच सत्त्व, रज व तम हे त्रिगुण व



पृथ्वी, आप, तेज, वायू व आकाश ही पंचमहाभूते सूक्ष्मरूपाने अंतर्भूत असतात, यासच आपण महद्ब्रह्म म्हणतो.

आत्मा आणि प्रकृति यांच्या संयोगाने प्रथम बुद्धीतत्त्व उत्पन्न होते व तीच बुद्धी बळावल्यावर मन उत्पन्न होते. मनाची स्त्री ममता हिच्यापासून अहंकार उत्पन्न होतो व त्यांच्या योगाने पंचमहाभूतांची निर्मिती होते. या पंचमहाभूतांशी विषय व इंद्रिये यांचा संबंध असल्यामुळे त्यांचीही निर्मिती होते. विषय व इंद्रिये यांचा क्षोभ होताच पाठी त्रिगुण उभे राहतात. तेच हे सत्व, रज व तम होय. आणि त्रिगुणांच्या योगाने ज्या त्या गुणाच्या प्रबलतेनुसार वासना होईल त्याप्रमाणे जीव जागोजागी जन्म घेतो.

अंडज, स्वेदज, उद्भिज आणि जारज असे अंकूर मूळ प्रकृतीत फुटतात. चौऱ्याऐंशी लक्ष योनी निर्माण होतात.

अशा प्रकारे, मूळ आत्मस्वरूपावर निर्माण झालेल्या प्रकृतीच्या इतर तत्त्वांबरोबरच सत्त्व, रज व तम त्रिगुण निर्माण झाले. प्रत्येक जीव आत्मसत्तेवर आधारित असतो व प्रत्येक जिवात म्हणजेच प्रत्येक देहात त्रिगुण विद्यमान असतात. म्हणजेच कोणीही सुटलेले नाही.

तर महाराज, सेवेसाठी घेतलेल्या पहिल्याच ओवीत माऊली ज्ञानेश्वर महाराज म्हणतात,

**तैसे सत्त्वाचेनि नटनाचे। असणे जाणे जयाचे।**
**ते तनुत्यागी स्वर्गीचे। राय होती॥२७१॥**

अशा प्रकारे सात्त्विक वृत्तीचे आचरण करतात ते देह ठेवल्यानंतर स्वर्गात जातात.

या मृत्युलोकी त्रिगुणात्मक देह प्राप्त होतो. त्या सत्त्व, रज व तम या तीन गुणांपैकी सत्त्वगुण हा एकच गुण उच्चतर स्थितीत प्राप्त करून देण्यास समर्थ आहे एवढेच नव्हे तर प्रत्यक्ष परमेश्वर प्राप्त करून देण्याची क्षमता या गुणात आहे. फक्त त्या सत्त्वगुणाचेही शुद्ध सत्त्वगुणात रूपांतर होणे गरजेचे आहे. सर्वोत्कृष्ट असलेला हा सत्त्वगुण कसा असतो ते आता आपण पाहू.

सत्त्वगुण हा निर्मल आणि प्रकाशक असतो. सत्त्वगुणाची वृद्धी देहात होताच ज्ञान हे अंतर्यामी ओतप्रोत भरून बाहेर निघते. इंद्रियांचा सत्कर्मे करण्याकडेच ओढा होतो. दुष्कर्म आपोआप टाळले जाते. ऐकू नये ते कानच ऐकत नाहीत. बोलू नये ते जीभच बोलत नाही. पाहू नये ते डोळेच पाहत नाहीत. बुद्धीच्या ठिकाणी सर्व शास्त्रांचा पूर येतो. ज्ञानाचा प्रकाश पसरतो. वासना नाहिशा होतात. माऊली ज्ञानेश्वर महाराज म्हणतात,

**वासना एकवटे। प्रवृत्ती वोहटे।**
**मानस विटे। विषयांवरी।।२१३।।**

सत्त्वगुणांची वृद्धी झाली असता त्याला विषयांचा वीट येतो आणि बुद्धीची धाव केवळ ज्ञानाकडे राहते.

भागवतात एकनाथ महाराज म्हणतात,

**वाढलिया सत्त्वगुण। स्त्रियादि भोगी उदासीन।**
**सदा करी भगवच्चिंतन। का करी कीर्तन हरीभक्ती।।**

**– अ. १३ ओवी ४६**

सत्त्वगुणाची वृद्धी होताच परमेश्वराबद्दल प्रगाढ प्रेम उत्पन्न होते. विचारशील वृत्ती कायम राहणे, परमार्थाची अतोनात आवड उत्पन्न होणे, ही सत्त्वगुण वाढल्याची लक्षणे असतात. सत्त्वगुणी माणूस नाना प्रकारची दाने करतो. वेगवेगळ्या प्रकारची व्रते करतो. देवकार्यात मोठ्या उत्साहाने भाग घेतो. देवांचे निरनिराळे उत्सव साजरे करतो. या आपल्या ज्ञानेश्वरी पारायण सप्ताहासारखे सप्ताह आयोजित करतो. श्रीकृष्ण जन्माष्टमी, श्रीराम नवमी, श्री दत्तजयंती, श्री तुकाराम बीज इ. प्रकारच्या सोहळ्यात सहभागी होतो. सहकार्य करतो. सत्त्वगुणी माणूस आस्थेने कीर्तने, प्रवचने करतो किंवा ऐकतो. त्याला संतांबद्दल नितांत आदर व प्रेम असते. तो सत्संगात रमतो. तो शांतीप्रिय असतो. भक्तिप्रेम हा तर त्याच्या जीवनाचा स्थायीभावच असतो. त्याचे अंत:करण दयेने भरलेले असते. तो नेहमी क्षमाशील असतो. समर्थ रामदासस्वामी दासबोधात म्हणतात,



**शांती क्षमा आणि दया। निश्चय उपजे जया।**
**सत्त्वगुण जाणावा तया। अंतरी आला।।५२।।**

**– श्री दासबोध, दश.२ रे, समा. ७ वा.**

या बाबतीत पंजाबचे राजे रणजितसिंह यांची एक कथा प्रसिद्ध आहे. एकदा महाराज रणजितसिंह आपल्या सैनिकांसह राजधानी बाहेरच्या रस्त्याने चालले होते. अचानक एक छोटासा दगड येऊन महाराजांना लागला. अर्थातच सैनिकांनी ज्याने दगड भिरकावला होता, त्या व्यक्तीस तात्काळ शोधून काढले. ती एक वृद्ध स्त्री होती. महाराजांच्या पुढे आणताच ती खूपच भ्याली. महाराजांनी काही विचारायच्या आतच ती म्हणाली,

''महाराज, माझा नातू कालपासून उपवासी आहे. घरात त्याला द्यायला काहीच नाही. म्हणून मी बोरे पाडून त्याला द्यायला झाडावर दगड मारला होता. पण तो चुकून आपणास लागला. मोठी चूक झाली. माफी असावी.''

महाराज रणजितसिंहानी तात्काळ हुकूम दिला,

''या वृद्ध स्त्रीला एक हजार रुपये देऊन सोडून द्या.''

हा हुकूम ऐकून सैनिकांना खूपच आश्चर्य वाटले. या बाईला शिक्षा देण्याऐवजी महाराज पैसे देण्याचा हुकूम देतात म्हणजे काय? त्यांच्या मनातला प्रश्न जाणून महाराज म्हणाले,

''जर एक वृक्ष दगड लागूनही, तो मारणाऱ्याला एक फळ देतो, तर पंजाबच्या महाराजांनी काय द्यावयास हवे?

दया, क्षमा आणि शांती या सत्त्वगुण लक्षणाच्या महाराज रणजितसिंहांबद्दलचा आदर आपल्या मनात द्विगुणित झाला नाही तरच नवल!

सत्त्वगुणी माणसाला अखिल प्राणीमात्रांविषयी प्रेम असते. मुक्या प्राण्यांचे दु:खदेखील सत्त्वगुणी माणसास पाहवत नाही. आपल्यावर अपकार करणाऱ्या माणसावरदेखील, तशी वेळ आल्यास, सत्त्वगुणी माणूस उपकारच करतो.

न्यायमूर्ती राम केशव रानडे महाराज रत्नागिरीला सेशन जज्ज असताना, त्यांना एक सत्यकथा ऐकायला मिळाली. ती अशी,

कोकणातील खेडेगावात एक गरीब माणूस राहत होता. त्याचा छोटा मुलगा आजारी पडला. आजार विकोपाला गेला. तो माणूस आपल्या मुलास घेऊन नजिकच्या शहरात बऱ्यापैकी प्रॅक्टिस चाललेल्या डॉक्टरांकडे घेऊन आला. डॉक्टर बाहेर निघण्याच्या तयारीत होते. त्या माणसाने आपल्या मुलाच्या आजाराचे गाऱ्हाणे डॉक्टरांना सांगितले. पण डॉक्टरांनी 'आता मला वेळ नाही' असे सांगून त्या छोट्यावर उपचार न करताच प्रयाण केले. त्या गरीबाच्या खूप विनवण्यादेखील डॉक्टरांच्या अंत:करणास पाझर फोडू शकल्या नाहीत. मागे, काही वेळातच त्या गरीबाचा तो छोटा मुलगा मरण पावला. तो बिचारा गरीब आपल्या मुलग्याचे प्रेत घेऊन आपल्या घरी गेला.

पुढे काही महिन्यांनी घटना अशी घडली की, त्या डॉक्टराच्या छोट्या मुलासच साप चावला. आताच्यासारखी त्या काळी स्थानिक पातळीवर सर्पविषाविरुद्धची लस उपलब्ध नव्हती. डॉक्टरांनी आपल्या मुलग्यावर प्रथमोपचार सुरू केले. एवढ्यात कुणीतरी डॉक्टरांना सुचविले की अमूक एक माणसाकडे सर्पविषायावरील उताऱ्याची रामबाण औषधी आहे आणि तो माणूस दुसरातिसरा कोणी नव्हता तर ज्याच्या छोट्या मुलग्यावर वेळेत उपचार करण्यास डॉक्टरांनी नकार दिला होता; तोच तो गरीब माणूस होता. त्यास ताबडतोब निरोप पाठवण्यात आला.

त्या गरीब गृहस्थाच्या बायकोसमोरच हा निरोप त्यास सांगितला गेला. बायकोने अर्थातच तिकडे जाण्यास विरोध केला. नवरा तिला हळूच म्हणाला,

''ही मुळी घेऊन जातो. दुसरेच काही उगळून ते औषध मी त्या मुलास पाजतो. माझ्या डोळ्यादेखत त्याचाही मुलगा तडफडून मेलेला पाहतो.''

प्रत्यक्ष तो छोटा मुलगा तडफडलेला पाहताच त्या महान सत्त्वगुणी



माणसाच्या मनातले, अल्पकाळ निर्माण झालेले सूडविचार तात्काळ नष्ट झाले. बाळाला वाचवणे हे आपले कर्तव्य आहे, मग ते शत्रूचे असो वा मित्राचे असो. असा सात्विक विचार प्रबळ झाला. ताबडतोब त्याने खऱ्या रामबाण औषधाची मुळी उगाळून त्या औषधाचा डोस त्या मुलग्यास पाजला. हळूहळू मुलग्यास उतार पडत गेला आणि डॉक्टरांचा तो मुलगा बरा झाला.

डॉक्टरांनी त्या गृहस्थाची माफी मागितली. आभार मानले. बक्षीस म्हणून त्याच्या हातावर पाचशे रुपये ठेवले पण त्या सत्वशिल माणसाने तेच पैसे खाऊसाठी त्या मुलाच्या हातावर ठेवले. त्या मुलाच्या आईने आपले दागिने त्या गृहस्थाच्या हातावर ठेवले. परंतु त्याने तिला आपली बहीण मानून भाऊबिजेची ओवाळणीदाखल परत केले. तर अशा प्रकारे सत्त्वगुणी माणूस अपकारकर्त्यावर देखील उपकार करीत असतो.

परमेश्वरासाठी सारसर्वस्वाचा त्याग करण्याची त्याची तयारी असते. याचे सर्वोत्कृष्ट उदाहरण म्हणजे महान योगी संत तुकाराम महाराज हेच होतं. कोणत्याही प्रापंचिक वस्तूची त्यांनी आसक्ती धरली नाही. सत्त्वगुणाहूनही पुढची पायरी म्हणजे शुद्ध सत्त्वगुण होय. यामध्ये जगद्गुरू संत तुकाराम महाराज स्थित होते. किंबहुना सर्व संत हे शुद्ध सत्त्वगुणात स्थित असतात.

सत्त्वगुण वाढला असता तो पराकोटीच्या उच्चतम अवस्थेला पोहचताच त्याचे शुद्ध सत्त्वगुणात रूपांतर होते. त्याच शुद्धसत्त्वगुणात मुमुक्षुंचे विश्रांतीस्थान असा जो पुरुषोत्तम तो प्रगट होतो. मुमुक्षुंच्या मानवी देहाचे सार्थक होते. त्यास सायुज्य मुक्ती प्राप्त होते.

सर्वसाधारणपणे जिवात्म्यास उत्क्रांतीच्या टप्प्यावर पुढे नेण्याचे कार्य सत्त्वगुणामुळेच होते.

असा हा निर्मल आणि प्रकाशक उद्धारक सत्त्वगुण एखाद्या व्यक्तीच्या आत्मिक उन्नतीसाठी जसा उपयुक्त ठरतो तसाच तो त्याच्या ऐहिक सुखशांतीसाठीही उपयुक्त ठरतो. समाज हा व्यक्ती व्यक्तींचा बनत

असल्यामुळे, सत्वगुणी लोकांची संख्या जर भरपूर वाढत राहिली, तर समाजाचे स्वास्थ्यही वाढत राहते.

किंबहुना महाराज, आजच्या काळात सत्त्वगुणवृद्धीचीच सर्वाधिक आवश्यकता आहे. चांगल्या आचार-विचारांची प्रसृती होणे अत्यंत गरजेचे आहे.

सांप्रत काळात जो अनाचार-स्वैराचार-हिंसाचार वाढला आहे, त्यावर प्रभावी उपाय म्हणजे समाजात सत्वगुणाची वृद्धी होणे हा आहे. सत्य, अहिंसा, सद्धर्म, सदाचार यांचे आचरण होणे गरजेचे आहे. सर्वत्र बोकाळलेला गैराचार, स्वैराचार, भ्रष्टाचार यांचे कायद्याबरोबरच सत्वगुण वृद्धीने उच्चाटन करता येईल.

बंधुता, समता, संवेदना, सहकार्य या बाबी केवळ सत्त्वगुणवृद्धीनेच वाढू शकतात. ऐहिक आणि पारलौकिक स्वास्थ्य प्राप्त करून देणाऱ्या सत्त्वगुणाची जाणिवपूर्वक वृद्धी, अखिल मानवजातीच्या कल्याणासाठी करणे अत्यंत जरूरीचे आहे. सत्त्वगुणी माणूस हा इतरांस उपद्रव करणारा नसतो. सर्वांबद्दल प्रेम, आदर बाळगणारा असतो. इतरांना दु:ख देणे. त्याच्याकडून घडणे शक्य नसते.

संपूर्ण समाजात सत्त्वगुणवृद्धी होत राहिली तर अनेक सामाजिक समस्या आपोआपच सुटतील. नवीन समस्या निर्माण होण्याचे प्रमाण नगण्य राहील. यास्तव संपूर्ण जगातील, सर्व धर्मातील अनेक संत महात्मे, नेते, विद्वान नेहमी सद्विचार सदाचार यांचाच प्रसार-पौराणिक-ऐतिहासिक काळापासून सांप्रत काळापर्यंत करत आलेले आहेत. करीत आहेत. अखिल मानवजात ही एकाच परमेश्वरापासून उत्पन्न झाली असल्यामुळे परमेश्वर हेच त्याचे मूळ स्वरूप आहे. त्या मूळ स्वरूपाची प्राप्ती हेच मानवी जीवनाचे मूळ उद्दिष्ट आहे. तेच त्याचे निरामय, सच्चिदानंदघन नीजधाम आहे. चिरंतन दु:खमुक्तीचा आणि तसाच आनंदप्राप्तीचा ठेवा आहे. त्याच्या प्राप्तीसाठी सत्त्वगुणाची वृद्धी प्रत्येक मानवात होणे आवश्यक आहे. सत्त्वगुण हा परमेश्वरभक्तीप्रवण असल्याने ईश्वरप्राप्तीचे ज्ञान त्याच्यातूनच होण्याची शक्यता असते.



असा हा दिव्यसत्वगुण जाणीवपूर्वक कसा वृद्धिंगत करावा? कारण यामध्ये वैयक्तिक, सामाजिक, राष्ट्रीय आणि अखिल मानवजातीचे ऐहिक आणि पारलौकिक भले आहे. सत्वगुणवृद्धी जाणीवपूर्वक करता येते का? तर त्याचे उत्तर 'येते', हेच आहे. सात्त्विक आहाराचे सेवन हे सत्ववृद्धी करण्याचे सर्वाधिक महत्त्वाचे साधन आहे. सात्विक आहाराने सात्विक बुद्धी वाढून सदाचार घडत राहतो. अंत:करण शुद्ध होऊन जीवनास पवित्रता येत राहते. माणूस प्रेमळ व भक्तिवंत बनतो.

अखाद्य व अपेय यांचा त्याग करावा. सत्संगतीत राहावे चांगले विचार ऐकून तसाच आचार करावा. गुरुदीक्षा घ्यावी. गुरूभक्ती करावी. परमेश्वराच्या नामाचा नियमित जप करावा. निष्काम कर्म करण्याकडे कल ठेवावा. केलेले कर्म ईश्वरार्पण करण्याची सवय ठेवावी स्वद्धोराबरोबरच इतराचा उद्धार करण्याचा प्रयत्न करावा. त्यामुळे सत्त्ववृद्धीच होत राहील.

सत्त्ववृद्धी होताच माणूस सात्त्विक बनेल. सात्त्विक माणूस सात्त्विक विचार-आचार करील. त्याची श्रद्धाही सात्त्विक असेल त्याचे तप, दान इ. सात्विकच होईल. तो सत्त्वाचाच होईल.

आणि शेवटी त्या सत्वगुणापासून आपणास काही ऐहिक लाभ व्हावा, मी ज्ञानी, मी सात्त्विक, मी वेगळा अशी कीर्ति पसरावी अशी अपेक्षा न ठेवता प्रगाढ ईश्वर स्मरणातच निमग्न राहिल्यास त्याचे शुद्ध सत्वगुणात रूपांतर होऊन गुणातीत अवस्था प्राप्त होते. मग अगदी निश्चित त्यास ईश्वरप्राप्ती होते.

याउलट, मी ज्ञानी, मी इतकी सत्कृत्ये केली, मी सात्त्विक, मी विद्वान, मी आणखी सत्कृत्ये करीतच राहीन. त्यामुळे माझ्या किर्तीत आणखी भर पडत राहील. माझी जनमान्यता अधिकच दृढ होईल, इत्यादी. सात्त्विक बाबींच्या उत्कर्षात असलेल्या सात्विकाचा जर मृत्यु झाला तर त्याला स्वर्गाची प्राप्ती होते. सेवेसाठी घेतलेल्या श्लोकांवरील पहिल्या ओवीत हे श्री ज्ञानेश्वर महाराजांनी सांगितले आहे.

भूलोक, भुवर्लोक, स्वर्गलोक, महर्लोक, जनलोक, तपोलोक, सत्यलोक असे सात लोक आहेत. आत्मिक उन्नतीच्या वाटेवर, स्वर्गलोकाची प्राप्ती होणे ही बाब सुद्धा अतिशय उत्कृष्ट आहे. त्याहीपेक्षा सात्विक आचरणाने निरपेक्ष ईश्वरभक्ती करून, गुणरहीत होऊन परमेश्वरप्राप्ती करून घेणे, हे सर्वोत्कृष्ट आहे. त्यासाठीच श्री ज्ञानेश्वर माऊलींनी हे दिव्यज्ञान सांगितले आहे.

केवळ स्वर्गलोकाची प्राप्ती आणि तेथील दिव्य उपभोग, हे आपल्या मानवजन्माचे उद्दिष्ट नसून ते ईश्वरप्राप्ती हे आहे. कारण स्वर्गीचे अमरही पुण्यक्षय होताच मृत्युलोकी जन्मतात. यासाठी सत्त्ववृद्धी करून-सात्त्विक होऊन सात्त्विक-निरपेक्ष ईश्वरभक्ती करून सत्-चित्-आनंदाची प्राप्ती करून घेणे आवश्यक आहे. तेच अंतिम हिताचे आहे.

सेवेसाठी निवडलेल्या दुसऱ्या व तिसऱ्या ओवीत रजोगुणींच्या अंतिम स्थितीबद्दल सांगताना श्री ज्ञानेश्वर माऊली बोलतात,

**इयाचिपरी रजे। जिही का जीजे मरिजे।**
**तिही मनुष्य होईजे। मृत्युलोकी।।२७२।।**

**तेथे सुखदुःखाचे खिचटे। जेविजे एकेचि ताटे।**
**जेथे इथे मरणवाटे। पडिले नुठी।।२७३।।**

रजोगुणी व्यक्तीच्या अंतिम परिणितीबाबत बोलतांना किती सार्थ ओव्या प्रगट केल्या आहेत! रजोगुणाच्या प्रबळ प्रभावात अखंड जीवन जगून त्याच स्थितीत जे मृत्यू पावतात, त्यांना पुढील जन्म मनुष्याचाच मिळतो. मनुष्याचा जन्म म्हणजेच जडदेहाची जन्मापासून मृत्युची साथ असलेला मृत्युलोक होय आणि या मृत्युलोकात एकाच देहामध्ये सुखदुःख भोगावे लागते. येथे काही केल्याने मृत्यु टळत नाही! जिवास मृत्युलोकात तिष्ठत ठेवणारा असा रजोगुण असतो तरी कसा? त्याची लक्षणे काय असतात हे जाणून घेणे आवश्यक आहे.

रजोगुणाचे लक्षण सांगताना माऊली ज्ञानेश्वर महाराज म्हणतात,



**हे रज याचि कारणे। जीवाते रंजवू जाणे।**
**हे अभिलाखाचे तरुणे। सदाचि गा।।१६०।।**

हा रजोगुण प्रीतीस्वरूप आहे. या गुणापासून जिवाचे नेहमी रंजन होते. याच गुणामुळे कामवासना सदैव जागृत राहते. म्हणूनच रजोगुण हे योग्य नाव यास दिले आहे. या गुणाचा प्रभाव असणारी व्यक्ती उपभोगाविषयी कमालीची आसक्त असते.

काम्य कर्मावाचून कोणतेही काम करण्याचे रजोगुणी व्यक्ती टाळत असते. इहलोकीच्या तसेच परलोकीच्या सुखांविषयी रजोगुणी माणूस सदैव जागृत असतो. तो सदैव महामोहाने ग्रासलेला असतो. कितीही उपभोग घेतला तरी त्याची तृप्ती कधीच होत नाही. इंद्रियांना सुखावह वाटणाऱ्या कृती करण्याचे कार्य रजोगुणी व्यक्ती अखंड करीत असते.

कितीही धन मिळाले तरी रजोगुणी व्यक्ती आणखी धनाची अपेक्षा धरत असते. ते मिळवण्यासाठी निरनिराळे मार्ग अनुसरित असते. मन रजोगुणांनी भरले की प्रचंड संकल्प-विकल्प निर्माण होत असतात. अचाट कार्ये करण्याचा व त्याद्वारे धन व कीर्ति मिळविण्याचा प्रयत्न रजोगुणी माणूस करीत असतो. रजोगुणी व्यक्तीच्या चित्तामध्ये कामाशिवाय दुसरी स्फूर्तीच होत नाही.

लोभस नावाचा एक माणूस होता. तो तरुण व अविवाहित होता. त्याचे एक झोपडीवजा घर होते. त्याचा छोटा व्यापार होता. त्याला नेहमी वाटायचे की, आपणास व्यापारात भरपूर नफा मिळावा, खूप पैसा शिल्लक पडावा आणि हे आपले जुनाट घर पाडून त्याजागी सुंदर बंगला बांधावा. त्यानंतरच आपण लग्न करावं. सुखाचा संसार थाटावा. आपल्या या सुखस्वप्नास अनसरून त्याने प्रचंड कष्ट करीत युक्ती-प्रयुक्तिने छोट्या व्यापारातील आपली उलाढाल वाढवली. ती वाढती राहून जास्तीत जास्त नफा कसा मिळेल याकडे त्याने कटाक्षाने लक्ष पुरवले. त्याच्या अतोनात श्रमामुळे त्याची आवक वाढली. पण स्वास्थ्य कमी झाले.

त्यास क्षणभराचीही उसंत मिळेना आणि स्वस्थही बसवेना. ज्यादिवशी व्यापाराच्या उलाढालीत त्यास जास्त नफा मिळे, त्यादिवशी तो भलताच खूष असे. त्यावेळी तो स्वस्थ बसे असे नव्हे तर उद्या त्या नफ्यात वाढ कशी करता येईल, याचा विचार करीत असे. त्यामुळे स्वास्थ्य त्याच्यापासून दूर जात असे. ज्या दिवशी व्यापारात त्याला तोटा होत असे, त्यादिवशी तो दु:खी होऊन झालेला तोटा भरून कसा काढायचा? अधिक नफा कसा मिळवायचा, या विचाराने तो ग्रस्त असायचा. या चिंतेत असल्याने स्वास्थ्य त्याच्यापासून आणखीच दूर जायचे. काही नव्या योजना आखीत असे, राबवीत असे. यावेळी ही सुखनिद्रा त्याच्यापासून दूरच असे.

त्याचा उद्योगीपणा, नशिबाची साथ यामुळे काही काळाने त्याला यश येऊन, बराच पैसा शिल्लक टाकण्यात तो यशस्वी झाला. जुने घर पाडून त्या ठिकाणी त्याने छोटेखानी टुमदार सुंदर बंगला बांधला. रंगकाम वगैरे पूर्ण झाल्यावर थाटात वास्तुशांती घातली. लोकांना मिष्टान्न भोजन दिले. त्यांनी आपली स्तुती करावी म्हणून त्याने आपल्या कष्टांची, फायद्याची, मिळकतीची माहिती मोठ्या हुषारीने लोकांना सांगितली. लोकांनी तोंडावर त्याची 'वाहवा' केली. त्या क्षणी त्यास धन्य वाटले.

एक दोन दिवस गेल्यावर एक व्यक्ती त्याच्यापाशी आली. त्याने दुसऱ्या माणसाची कागाळी केली. अमूक एक माणूस असा म्हणाला की, 'बंगला चांगला आहे, पण फारच छोटा आहे.' त्या क्षणीच तो संकल्प करता झाला, याच बंगल्याच्या चहूबाजूंनी विस्तार करून तो मोठा करीन.

त्यानंतर त्याचे लग्न झाले. त्याने व्यापारातही वाढ केली. पुढे त्यास दोन मुले झाली. संसाराचा खर्च वाढत राहिला. त्याने व्यापार आणखी वाढवला. एक मोठे वाहन स्वत:साठी, दुसरी दोन वाहने मुलांसाठी खरेदी केली. मुलांच्या भवितव्याचीही तरतूद केली. पण बंगलाविस्ताराचे त्याचे स्वप्न काही साकार होईना.

त्या स्वप्नाचा त्यागही तो करेना. त्यासाठी तो अधिक नफा



मिळवण्याचे मार्ग शोधू लागला. त्यानुसार त्याने सोन्याचे अलंकार-चांदीची भांडी वगैरे मौल्यवान धातूंच्या खरेदीविक्रीचा व्यवसाय नव्याने चालू केला.

सोन्या-चांदीचे दागिने, भांडी वगैरे मौल्यवान वस्तू असलेली पेटी घेऊन व्यापारासाठी तो सागरमार्गे बोटीतून निघाला. दरम्यान समुद्रावर प्रचंड वादळ सुटले. बोट हेलकावे खात भरकटली. पाण्यातील मोठ्या खडकावर आपटून बोटीला मोठे भगदाड पडले. बोटीत पाणी भरू लागले. सुदैवाने तेथून जवळच एक बेट होते. लोकांनी जीव वाचवण्याचा प्रयत्न म्हणून पोहून त्या बेटावर जाण्यासाठी पाण्यात उड्या टाकल्या. बेटाचे अंतर फार नसल्याने, जीवरक्षक साधनांच्या सहाय्याने ते पोहत त्या बेटावर पोहचले. परंतु त्या लोभस नावाच्या व्यापाऱ्याने काय केले?

त्याने विचार केला की, एवढी प्रचंड संपत्ती सोडून पोहत बेटावर जाणे योग्य नाही. बोटीत पाणी भरत होते. त्याने ती पेटी दोरखंडाने आपल्या पोटाशी बांधली. पाण्यात उडी घेतली. खवळलेल्या समुद्रात पेटीचे वजन आणि त्याचे स्वत:चे वजन सांभाळीत पोहणे त्यास मुश्किल होऊ लागले. लाटांबरोबर तो भलतीकडेच भरकटू लागला. तरीही त्याला ती पेटी सोडून द्यावी, असे वाटेना. त्या संपत्तीची त्याला अनिवार आसक्ती असल्यामुळे त्याने पेटी सोडली नाही. अखेरीस संपूर्ण शक्तीक्षय होऊन नाकातोंडातून पाणी जाऊन त्याचा श्वास कोंडून मृत्यु झाला. आसक्ती कवटाळूनच धनासक्तीसह तो मृत्यु पावला. त्याचे स्वप्नही अपुरेच राहिले. धनासह तो पाण्यात सागरतळाशी मृत होऊन पोहचला. रजोगुणी माणसाचा लोभ हा असा असतो.

रजोगुणी व्यक्तीच्या जीवनात परमार्थाला तितकेसे स्थान नसते. असा माणूस देवाची भक्तीसुद्धा करतो. पण त्या भक्तीच्या मोबदल्यात त्याला देवाकडून काही ना काही प्रापंचिक सुखाची अपेक्षा असते आणि जर देवाकडून त्याला ते प्राप्त झाले नाही तर तो भक्तीचा त्याग करून टाकतो.

ऐतिहासिक काळाचा विचार केला तर आपल्या राज्याच्या सीमा विस्तारण्यासाठी असंख्य राजांनी दुसऱ्या राज्यावर हल्ले केले आहेत. असंख्य युद्धे झाली आहेत. असंख्य प्राणहानी झाली आहे. पशू आणि मानवाच्या रक्ताचे पाट वाहिले आहेत. अनेक राज्यांचे स्वातंत्र्य व सार्वभौमत्व हिरावून घेतले आहे. विस्तारवादी वृत्ती आणि आपण सम्राट म्हणून कीर्ति मिळवण्यासाठी अनेक राजांनी अशा प्रकारे, हव्यासापोटी अगणितांचे बळी दिले आहेत. अनिवार लालसा, मग ती कोणतीही असो, हे रजोगुणचे लक्षण आहे.

परंतु मानवी जीवन जगत असताना या रजोगुणाचाही फार मोठा फायदा होतो. हा रजोगुण लालसेपायी का होईना कार्यप्रवण बनवतो. मोठं मोठी हितकारक कार्ये केवळ या रजोगुणामुळे घडून येऊ शकतात. मानवी जीवनाला उपकारकारक अशा असंख्य गोष्टी केवळ रजोगुणाच्या प्रभावामुळे घडून आलेल्या आहेत. म्हणून संतांनी प्रत्येक गुणाचे शुद्ध व शबल असे दोन भाग केलेले आहेत. शुद्ध रजोगुण हा सत्त्वगुणाकडे नेतो तर 'मी आणि माझे' एवढ्याचपुरता असणारा शबल रजोगुण, तो मर्यादित असल्याने, प्रापंचिक आसक्तीत माणसास बांधून टाकतो.

यास्तव शबल रजोगुणी व्यक्तीने शुद्ध रजोगुणाकडे वाटचल करून सत्त्वगुण आत्मसात करण्याचा प्रयत्न करावा. दृष्टी अंतर्मुख करून पाहावे. व्यापक भूमिकेवर जाण्याचा प्रयत्न करावा. परमेश्वराची भक्ती करावी. सत्संगात जावे. मनाला मुरड घालावी. भोगलालसा, हाव कमी करावी. मोह टाळावा. सात्त्विक आहार घ्यावा. मोह टाळावा. म्हणजे माणसाचे अंतरंग हे सत्त्वगुणाकडे वाटचाल करू लागते.

संसारात आसक्त असणारा रजोगुणी माणूस जर परमेश्वर भक्तीकडे वळला नाही. विवेक, वैराग्य, आत्मभान अंगी बाणवले नाही, तर तो आत्मिक उन्नतीच्या पुढील टप्प्यावर न जाता त्याच गुणात तिष्ठत राहतो. मृत्यु पावतो. पुन्हा जन्मतो, दु:ख भोगतो. यातनेचे जन्म-मरणाचे चक्र तो तोडू शकत नाही.



मृत्युलोक सुखावह नाही हे माऊली या ठिकाणी पुन्हा दर्शवतात. याचे नावच मृत्युलोक असे आहे. या जगात जन्मलेल्या मानवास, गर्भापासून यातना भोगाव्या लागतात. सुखाचा मुलामा दिलेल्या दु:खाच्या गोष्टी भोगाव्या लागतात. गोडवा असणाऱ्या चवीच्या विषारी गोष्टी चाखाव्या लागतात. आवडीने अगोदर चाखलेल्या वरून गोड चवीच्या कडू विषारी गोष्टीचा गोडवा सरतो न सरतो तोच त्यास आतील खरा कडवटपणा चाखावा लागतो आणि त्यापुढे ज्या शारीरिक आणि मानसिक यातना होतात, त्याचे वर्णन करवत नाही आणि ज्या देहाच्या ताटात ही सुखदु:खाची खिचडी खावी लागते. त्या देहाचे मरण कोणत्याही उपायाने टाळता येत नाही. फार झालं तर कृत्रिम श्वासोच्छ्वासावर ते लांबवता येईल, पण पूर्णपणे टाळता येत नाही. जीवनरक्षक प्रणालीचा उपयोगही अर्थातच एका मर्यादेपर्यंतच होतो.

गर्भवासातील दु:ख जेवढे भयंकर आहे, त्याहून अखंड आयुष्य ज्या यातना, मग त्या कायिक-मानसिक अशा कोणत्याही प्रकारच्या असोत, त्या भीषण आहेत. आयुष्यभराच्या अशा प्रकारच्या यातना जितक्या भयंकर असतात त्याहीपेक्षा मरणयातना अधिक तीव्र असतात. याचसाठी श्री ज्ञानेश्वर माऊलींनी म्हटले आहे - सुखदु:खाची खिचडी एकाच ताटात खावी लागते आणि मृत्यु कशानेही टळत नाही.

शबल रजोगुणातून शुद्ध रजोगुण - त्यातून सत्त्वगुण व सत्त्वगुणातून शुद्ध सत्त्वगुण हा टप्पा गाठला गेला नाही तर - म्हणजे रजोगुणात आसक्त असताना जर मृत्यु आला तर तेच मोहग्रस्त उद्योग आणि भीषण दु:ख भोगण्यासाठी जीवास परत मृत्युलोकी जन्मास यावे लागते.

सेवेसाठी निवडलेल्या चौथ्या ओवीत, श्री ज्ञानेश्वर माऊली म्हणतात,

**आणि तयाचि स्थिती तमी। जे वाढोनि निमती भोगक्षमी।**
**ते घेती नरकभूमी। मूळपत्र।। २७४।।**

आता तिसरा, जो तमोगुण आहे तो वाढला असता देह पडणाऱ्या जिवाची, जी अवस्था होते, त्याचे वर्णन श्री ज्ञानेश्वर महाराज या ओवीत

करतात. तमोगुणाचे आचरण करतात आणि त्याच स्थितीत मृत्यु पावतात ते नरकात जाण्याची सनद मिळवतात.

असा हा तमोगुण असतो तरी कसा? त्याची लक्षणे काय असतात, हे जाणून घेणे महत्त्वाचे आहे. माऊली म्हणतात,

**अज्ञानाचे जियाले। जया एका लागले।**
**जेणे विश्व भुलले। नाचत आहे।।१७५।।**

**अविवेक महामंत्र। जे मौढ्यमद्याचे पात्र।**
**हे असो मोहनास्त्र। जीवांसी जे।।१७६।।**

अज्ञान हे तमोगुणाचे पहिले लक्षण होय जे दिसते तेच सत्य आणि बाकी सारे खोटे, अशी त्याची धारणा असते. ज्ञानाची कोणतीही गोष्ट त्याच्या डोक्यात शिरणे कठीण असते. विचाराने कृती करण्याचे त्यांना भान नसते, तर अविचार हाच त्यांचा महामंत्र असतो. तमोगुण हा जणू अज्ञानरूप मद्याचे भांडेच असते. दृश्य आणि अदृश्य अशा जगाच्या अंगी तमोगुण वाढू लागला तर त्याजागी तो दुसऱ्या कशाचाही शिरकाव होऊ देत नाही. तमोगुणामुळे सर्व इंद्रिये जड होतात तो मनाला मूर्खत्व प्राप्त करून देतो. त्यामुळे आळस हे तमोगुणाचे महत्त्वाचे लक्षण प्रगट होते. तमोगुणी माणूस कर्तव्यतत्पर नसतो. काम करण्यापेक्षा काम टाळण्याचेच काम तो करत असतो. डोळे उघडे असूनही अशा माणसास समोरच्या वस्तूचे अकलन होत नाही. अनिवार निद्रा - म्हणजे झोप हे तमोगुणाचे आणखी एक लक्षण होय. त्यास झोप अतिशय प्रिय असते. तिच्यापुढे तो स्वर्गदेखील तुच्छ मानतो. त्यास कोणी काम करावयास सांगितले तर तो रागाने आंधळा होतो.

कोणत्या वेळी कसे वागावे, कोणाबरोबर कसे बोलावे याचे त्यास भान नसते. ज्याच्याबरोबर त्यास आर्थिक व्यवहार करावयाचा आहे, त्याच्या योग्यता-अयोग्यतेचा विचार तो करीत नाही. कोणतेही कर्म करीत असताना परिणामांचा विचार तो करीत नाही



तमोगुणी माणसाचे मन म्हणजे जणू अमावस्येच्या रात्रीचे आकाशच असते. तो बुद्धीने इतका कठीण असतो की, त्याच्यापुढे दगडही मऊ ठरावा. आठवण नावाची चीज त्याच्या मेंदूत फार कमी असते.

प्रमाद हा तमोगुणी माणसाच्या लक्षणापैकी अत्यंत महत्त्वाचे लक्षण आहे. ते महत्त्वाचे अशासाठी की ते अत्यंत घातक आहे. तमोगुणी माणूस कोणत्या क्षणी आघोरी कृत्य करील हे सांगता येत नाही. त्याच्या त्या दृष्कृत्याचे दुष्परिणाम त्याच्यासह साऱ्या समाजाला भोगावे लागतात. तमोगुणी माणूस अनाचाराने इंद्रियसुखाची प्राप्ती करीत असतो. दुष्कृत्य करण्याची त्यास हौस असते. संपूर्ण समाजाने जी कृत्ये निषिद्ध ठरवलेली आहेत, तीच करण्याची तमोगुणी माणसास फार हौस असते. 'त्याला काय होतंय?' अशी वृत्ती असते. निषिद्ध कर्मे करण्याकडेच त्याची इंद्रिये आसक्त असतात. त्याचे चित्त ताळ्यावर नसते. तो मोहाने उन्मत्त झालेला असतो. तमोगुणी व्यक्तीच्या कृत्याने संपूर्ण समाजाचे स्वास्थ्य, त्याचे वर्तमान जीवन व भवितव्यही धोक्यात येत असते.

भक्तहो, आजच्या समाजाकडे पाहिले तर काय दिसते? समाजात तमोगुणाचे प्राबल्य वाढल्याचेच दिसून येते. चोऱ्या, दरोडे, खून, बलात्कार, अपहरण, मादक पदार्थांची तस्करी, त्यांचे सेवन, व्यसनाधीनतेचे वाढते प्रमाण, सत्पुरुषांच्या विचारांची खिल्ली उडवण्याची नीच प्रवृत्ती, ही सारी कशाची लक्षणे आहेत? स्वत:ला तथाकथित पुढारी म्हणून घेणारी व्यक्ती निवडणूक खर्च डोळ्यासमोर ठेवून खंडणी उकळण्याकरिता दहा-बारा वर्षांच्या निरागस शाळकरी मुलाचे अपहरण करते. त्यास ओलीस ठेवते. खंडणी मिळाली नाही म्हणून त्याची हत्या करते. केवढा हा निर्दयी प्रमाद, किती क्लेषदायक ही बालहत्या. ही कृती कोणत्या गुणाचे प्राबल्य दर्शवते? वरपासून खालपर्यंत उघडी पडणारी अनेक गैरकृत्ये कशाचे लक्षण आहे? तमोगुण वाढल्याच्या द्योतकाची किती म्हणून उदाहरणे सांगावीत? महाराज, आपण सर्वजण ज्ञातेच आहात. आपणास सर्व ठाऊकच आहे.

तर भक्तहो, तमोगुणाचे उच्चाटन समाजातून होणे अतिशय गरजेचे

आहे. केवळ तमोगुणी व्यक्तीस त्याच्या अपराधाबद्दल शिक्षा करून किंवा त्या व्यक्तीस त्याच्या अपराधाबद्दल शिक्षा करून किंवा त्या व्यक्तीस नष्ट करून तमोगुणाचे प्राबल्य समाजातून नष्ट होऊ शकत नाही. तर त्याबरोबरच, शुद्ध सत्त्वगुणाचा प्रसार करून सदाचार समाजाच्या अंगी बानवण्याचे प्रयत्न करणे अतिशय आवश्यक आहे. श्री ज्ञानेश्वर माऊलींनी पसायदानात मागणे मागितले आहे की,

**जे खळांची व्यंकटी सांडो। तया सत्कर्मीरती वाढो।**
**भूता परस्परे पडो। मैत्र जिवांचे।।**

दुष्टांचा कुटिलपणा जाऊन त्यांच्या ठायी सत्कर्माबद्दल प्रेम उत्पन्न होवो, ही मागणी खुद्द माऊली करतात. प्राणीमात्रांचे एकमेकांबद्दलचे प्रेम वाढावे असेही त्यांनी म्हटले. सर्व प्रकारच्या पापांचा अंध:कार नष्ट व्हावा असे मागणे ते विश्वात्मक देवाकडे मागतात.

संपूर्ण मानव समाजाचे स्वास्थ्य टिकून समाज सत्कर्माकडे वळण्यासाठी, तमोगुण नष्ट होणे गरजेचे आहे. त्यामुळे अखिल प्राणीमात्रांचे सुखस्वास्थ्य तर टिकेलच टिकेल, पण आध्यात्मिक उन्नती होण्यासाठीही ते आवश्यक आहे. सत्पुरुष, तत्त्ववेत्ते, विचारवंत हा तमोगुण नाहीसा करण्यासाठी विविध मार्गांनी प्रयत्न करीतच असतात. यासाठी थोर थोर नेत्यांनी सत्वगुणाला प्रतिष्ठा प्राप्त करून दिली पाहिजे. ती केवळ दिखाऊ नसावी तर मनापासून असावी. सत्त्वगुणी व्यक्तीला आज 'बावळट' ही संज्ञा प्राप्त होत आहे, ही अतिशय खेदाची बाब आहे. चलाखीने धूर्त कावेबाजपणाने लाभ पदरात पाडून घेण्यास सत्त्वगुणी माणूस तत्पर नसतो. 'खुळचट' असा भाव त्यांच्याप्रती निर्माण होत आहे, हे घृणास्पद आहे. दुर्गुणास प्रतिष्ठा प्राप्त होणे, हे अधोगतीचे लक्षण आहे.

भक्तहो, तमोगुणी व्यक्तीच्या दुवर्तनाच्या सत्यकथा नित्य, इतक्या प्रचंड प्रमाणात साऱ्या समाजापुढे असल्यामुळे त्यातील एकही या प्रवचनात सांगण्याची गरज नाही.



इहलोकात, तमोगुणी व्यक्ती त्यांच्या गुन्ह्याबद्दल, कायद्याच्या बडग्याने साधी कैद, सक्तमजुरी, फाशी वगैरे शिक्षा भोगतात, हे आपण पाहतोच. त्यास आपण साधा 'नरक' असे नाव देऊ. इहलोकीच त्याला अशा प्रकारे नरकाची प्राप्ती होते, यास वेगळे प्रमाण देण्याची गरज नाही. परंतु माऊलींनी या ओवीत 'नरकाची सनद मिळवतात' असा जो उल्लेख केला आहे, त्यासाठी पौराणिक ग्रंथात अनेक उदाहरणे आहेत. त्याचप्रमाणे आध्यात्मिक इतिहासातही अशी असंख्य प्रमाणे आहेत. 'आध्यात्मिक इतिहास', हा शब्दप्रयोग ऐकून आपणास आश्चर्य वाटले असेल. त्याचा खुलासा असा की, अशा सत्यघटना, ज्या सत्पुरुषांनी आपल्या दिव्यदृष्टीने पाहिल्या आहेत. आध्यात्मिक कार्य करणाऱ्या अनेक साधकांनी त्यांचे अनुभव ग्रथित करून ठेवले आहेत. त्यातील उदाहरणे हेच दर्शवितात की, तमोगुणी व्यक्ती अधोगतीसच जातात. पशु, पक्षी, सर्प, विंचू आदि ज्या अधम जीवयोनी आहेत, त्यात ते तमोगुणी मृत्युपश्चात नरक भोगून झाल्यावर जन्मतात.

कित्येक तमोगुणी व्यक्ती तर मृत्युनंतर सुद्धा आपल्या दुष्कृत्याच्या आठवणींनी, व्यक्तीस पिडा करीत असतात. त्यांचे दुष्कृत्य त्यांच्या मरणानंतरही विसरले जाऊ शकत नाही, हे आपण जाणताच.

तमोगुणी ह्या नीच, दुष्ट प्रवृत्तीने युक्त असतात. त्या कधीही सद्गतीसच काय मध्यगतीसही जाऊ शकत नाहीत. तमोगुण हा सर्वार्थाने म्हणजे व्यक्ती, कुटुंब, समाज आणि अखिल मानवजात यांच्या दृष्टीने घातक आहे. तो ऐहिक आणि पारलौकिक प्रगतीमधला मोठा अडसर आहे. पण प्रयत्नांनी तो कमी होऊ शकतो.

यासाठी सत्संग, सद्विचार सदाचार, सात्त्विक आहार आदि बाबींची आवश्यकता आहे.

जसे की प्रवचनाच्या आरंभी सांगितले होते, की मूळ परब्रह्माला 'अहं'चे जे स्फुरण झाले. त्यातूनच मूळ माया निर्माण झाली. मूळ मायेला दोन अंगे होती. एक स्वस्वरूपाची ज्ञानमय जाणीव व दुसरी शक्तीगर्भ

अंग. या शक्तीगर्भ सामर्थ्याच्या दुसऱ्या अंगातच सत्त्व, रज व तम हे त्रिगुण उत्पन्न झाले.

मूळचे हे गुण जरी समान प्रमाणात असले तरी जीवयोनी सुरू झाल्यावर ज्या त्या प्राण्याच्या कर्माप्रमाणे सत्त्व-रज-तम या तीन गुणांच्या प्रमाणाचे मिश्रण कमी-अधिक प्रमाणात होत राहिले. त्याप्रमाणे त्यांच्या देहाचे स्वभाव बनत गेले. जिवाच्या देहामध्ये, त्या जिवाच्या देहाच्या मृत्युसमयी जो गुण प्रभावी असेल तो त्याच्यानंतरच्या जन्मात अधिक असतो. त्यानुसार त्या देहाच्या वृत्ती जन्मत:च असतात. म्हणूनच आपण पाचसहा वर्षांच्या काही मुलांच्या वर्तणूकीस पाहून म्हणतो की, हा मुलगा गुणी आहे. तो वांड आहे. तो खोडकर आहे वगैरे. हे आपण सहज म्हणतो. त्यापाठीमागे मागील जन्म आणि अनुवंशिकताही असते. जो तो आपल्या पूर्वकर्मानुसार जन्मत असतो. स्वभावानुसार वर्तत असतो.

अशी जरी स्थिती असली तरी परिस्थितीनुरूप, संगती, आहार, संस्कार, आघात इत्यादिंना अनुसरून त्रिगुणांचे देहातील प्रमाण कमीजास्त होत असते. त्यांच्यामध्येच अंतर्गत युद्ध चालू असते. जसे की एकाच घरात चाललेल्या भांडणास आपण गृहयुद्ध म्हणतो. तद्वतच या त्रिगुणांचे देह या त्यांच्या घरात गृहयुद्ध चालू असते.

सत्त्वगुण हा, रज व तम यांचा पाडाव करून स्वत: प्रबळ बनतो. तर संधी मिळताच रजोगुण हा सत्त्व व तम यांना जिंकून आपण बलवान बनतो. तर जिवांना अधोगतीस नेणारा तमोगुण हा जरा संधी प्राप्त होताच सत्त्व व रज या दोघांना जिंकून आपले अधिराज्य स्थापन करतो. गुणांचे हे युद्ध जीवांच्या देहरूपी घराच्या अंतरंगात सदैव चालू असते पण जिवांना त्याचा पत्ता लागत नाही.

दुसऱ्या शब्दात सांगायचे तर 'अमूक एक बिघडला' तर दुसऱ्या प्रसंगी 'अमूक एक आता सुधारला' असे उद्गार निघतात. तर अन्य वेळी 'आता त्याचं वागणं बरं आहे' असे म्हटले जाते. याचाच अर्थ बिघडणारा



सत्वगुणात होता पण रजतमांनी त्याला जिंकले त्याला आपल्या कब्जात घेतले. दुसऱ्या उद्गारात रजतमाचा पाडाव करून सत्वगुण जिंकला असा त्याचा अर्थ होतो. 'आता त्याचं वागणं बरं आहे' या उद्गारात फार चांगलंही नाही वाईटही नाही. म्हणजे सत्व-तम जिंकून रजोगुण राजा झाला, असा त्याचा अर्थ आहे.

जीवाच्या नकळत चालणारे हे त्रिगुणांचे युद्ध सत्वगुणी माणसाला त्याच्या नकळत केव्हा रजात व त्यातून तमात लोटील हे सांगता येत नाही. यासाठी सत्त्वगुणी माणसाने सदा सावधान राहिले पाहिजे. कारण हरवण्यासारखे सगळ्यात जास्त त्याच्याजवळच असते. म्हणून त्याने सदा सावधान राहणे, हे अत्यंत गरजेचे आहे.

पाचही पांडव हे सत्वगुणात स्थित होते, हे महाराज, आपणास माहिती आहेच. त्यामुळेच तर पुरुषोत्तम भगवान श्रीहरी त्यांच्या बाजूने आणि त्यांच्या नजिकच - प्रत्यक्ष होते. तरीही त्रिगुणांच्या देहरूपी गृहयुद्धाच्या तडाख्यातून ते सुटले नव्हते. तथापि, ते नेहमी सत्संगात असल्याने त्यांच्यामधील सत्त्वगुणच इतर दोन गुणांवर मात करीत, विजयी होत राहिला. स्वत: श्रीहरी हेच त्यांच्या जीवनरथाचे सारथी होते.

पांडवांच्या राजसूय यज्ञाच्या वेळची गोष्ट भक्तहो, आपणास ठाऊकच आहे. भोजनसमयी, जमलेल्या ब्रह्मवृंदाची प्रार्थना करून, त्यांना आग्रहाने भोजन करावयास लावण्याचे सात्त्विक काम महाशक्तीशाली भीमाकडे देण्यात आले होते. त्यानुसार हजारोंच्या पंगती जेवायला बसत होत्या. भीम त्यांची आरंभी, हात जोडून प्रार्थना करीत असे. नंतर गदा खांद्यावर घेऊन पंगतीतून फिरून जास्तीत जास्त पदार्थ खाण्याचा आग्रह करीत असे. असे एक दोन दिवस गेले. एखादा पदार्थ पानावर तसाच टाकून काहीजण, तृप्त झाल्यामुळे, उठत असत. सर्वत्र हे नेहमी थोड्याफार प्रमाणात घडतेच. आरंभी भीमसेनाने ते सर्व सहन केले. पण पुढे भीमसेन दरडावून सांगू लागला, ''जर पानात कोणी अन्न खरकाटे राखले तर गदा घालीन.'' अगोदरच अचाट कृत्ये करणारा तो भीम! त्यात त्याच्या

खांद्यावर गदा! वर ही तराटणी! त्यामुळे ब्रह्मजन पदार्थ घ्यायला भिऊ लागले. काहीजण तर अर्धपोटी उठू लागले. भीमाच्या भीतीमुळे खाल्लेले अन्नही त्यांच्या अंगी लागेनासे झाले. आपण पुण्य करता करता त्या पुण्यपुज्य ब्रह्मवृंदाला अर्धपोटी उठवण्याचे, आपल्या कठोर उद्‌गारांनी भरलेले तमोगुणी कार्य, आपल्या प्रचंड शक्तीच्या जोरावर आपण करीत आहोत, हे भीमाच्या कसे लक्षात येणार?

भगवान श्रीकृष्णांच्या ते लक्षात आले. भीमाची खोड मोडण्यासाठी भगवंतांनी त्यास आदेश दिला की, गंधमादनपर्वतावर जाऊन त्याने त्याच नावाच्या ऋषीस येथे घेऊन यावे.

भगवंतांच्या आदेशानुसार भीम गंधमादन पर्वतावर आला. भगवंतांची सारी कार्येच भव्यदिव्य असतात. ते सर्वत्र असल्यामुळे त्यांनी त्या क्षणीच पुढची सारी योजना हनुमानास सांगितली होती. त्यानुसार हनुमान भीमाच्या वाटेवर शेपूट आडवे टाकून बसला होता. भीम त्यास्थानी येताच, ते पाहून म्हणाला,

''ए माकडा, मला ऋषीच्या दर्शनास जाण्याची घाई आहे, तुझी शेपटी बाजूला घे!'' त्यावर हनुमान म्हणाला,

''मी आता वृद्ध झालो आहे. माझ्याच्यान ती उचलवत नाही. म्हणून तूच तेवढी ती उचलून बाजूस ठेव!''

भीमसेनाने आपल्या शक्तीसामर्थ्याने ते शेपूट उचलण्याचा प्रयत्न हरप्रकारे केला. पण त्यास ते तसूभरही हलले नाही. आपली सारी ताकद पणाला लावली तरीही त्यास ते शेपूट उचलणे शक्य झाले नाही. तेव्हा भीमसेनाचा गर्वनिरास झाला. हनुमानाने दर्शन देवून सांगितले,

''शक्तीचा गर्व न करता श्रीकृष्णाचे भजन करीत पुढे जा!''

गंधमादन ऋषीपाशी पोहचल्यावर त्यास पुढील उपदेश मिळाला. त्यांची अंगकांती सुवर्णासारखी होती. पण तोंड मात्र ओंगळपणे आणि किळसवाणे होते. भीमाने त्याबाबत विचारले असता ऋषी म्हणाले,

''मी पूर्वी सधन असतान सत्पात्री बराच दानधर्म केला. परंतु मी



त्यांना कठोर वचनेही बोलून पापकर्मही केले. त्यामुळे त्यांच्या शापांनी माझे तोंड हे असे ओंगळवाणे झाले आहे. म्हणून मी राजसूययज्ञात उपस्थित झालो नाही!'' हे ऐकून भीमास उपरती झाली.

भीम परतला. त्याने गदा घेऊन पंगतीतून फिरणे बंद केले. नम्रपणे मृदु आवाजात तो ब्रह्मवृंदाना म्हणू लागला. ''पानात राहिले तर प्रसाद म्हणून राहू द्या!''

सत्त्वातून रजोगुणात (अन्नदानाचे पुण्यकर्म) व रजोगुणातून तमोगुणात (विनाकारण कठोर वचने बोलणे, स्वशक्तीची घमेंड) अशा प्रकारे रूपांतर होत असते आणि जिवांना त्याचा पत्ताही नसतो. परंतु सत्त्वगुणानिकट परमेश्वर वास करीत असतो. यास्तव तो वाया जाणाऱ्या जिवास सत्वगुणाच्या मार्गावर परत आणत असतो, ते ही जिवाच्या नकळत!

म्हणून संतसंग, परमेश्वरभक्ती महत्त्वाची असते. त्यामुळे जिवास सत्कर्माची दिशा मिळते.

त्रिगुणांच्या या युद्धामध्ये, सत्त्वगुण वृद्धीसाठी प्रत्येक व्यक्ती प्रयत्न करू शकते. या मानवी मेंदूला विवेकबुद्धीची फार मोठी देणगी लाभली आहे. माणूस त्यामुळेच बरे वाईट ओळखू शकतो. हिताहित जाणू शकतो. संतांनी दाखविलेल्या मार्गाने चालून-सत्पुरूषांनी दिलेल्या सद्विवेकाचा अवलंब करून सत्वगुण अंगी बानवून स्वत:चे आणि समाजाचेही कल्याण माणूस सहज नसले तरी अविरत प्रयत्नांनी करू शकतो.

तर महाराज, आपण प्रकृतीच्या मूलभूत त्रिगुणांचा उहापोह केला. सूक्ष्म देहात वसणारे हे गुण, त्यांची इतकी गुंतागुंत असली, तरी अखेरीस त्यातूनही पार होता येते. गुणातीतता प्राप्त झाल्याखेरीज स्वस्वरूपाच्या प्राप्तीच्या वाटेवर पुढे जाता येत नाही. नुसत्या सत्त्वगुणाने व्यक्तिगत पातळीवर जरी स्वर्गप्राप्ती झाली तरी त्याचे पुन्हा पतन होते.

शुद्ध सत्त्वगुणाने अखंड परमेश्वरभक्ती घडत असल्याने जिवास दिव्य ज्ञानप्राप्ती होते. प्रकृतीमधील त्रिगुणांनीच सर्व व्यवहार, आत्मस्वरूपावर घडत आहेत, याची पक्की खात्री होते. 'प्रकृती करी कर्मे।

ती म्या केली म्हणे भ्रमे।।' याचा त्याला प्रत्यक्ष अनुभव येतो. गुण गुणात वर्तत आहेत. मी त्याहून वेगळा आहे. गुण हे देहात आहेत. परमेश्वराच्या सत्तेवर जी मूळ माया निर्माण झाली, तिचे हे त्रिगुण आहेत. ज्यातून 'अहं'चे स्फुरण झाले, ते मूळ परमेश्वरी तत्त्व मी आहे, याची त्यास खात्री पटते. माझे आत्मस्वरूप ते हेच आहे, तेच मला हवे आहे. तेच आदि-मध्य-अंतरहित, सत्-चित्-आनंद स्वरूप आहे. दृढ निर्धाराने तेच प्राप्त करण्याच्या दिशेने व्यभिचाररहित भक्ती करतो. त्यासच ज्ञानोत्तर भक्ती म्हटले तरी चालेल. असा ज्ञानोत्तर भक्ती करणारा भक्त जोपर्यंत देहधारी आहे तोपर्यंत त्रिगुणांचे गृहयुद्ध चालूच राहणार! पण त्याकडे 'गुण गुणात वर्तत आहेत, मी त्या परमात्म्याचे स्वरूप आहे,' अशा दृढ निर्धाराने भक्तीरत राहतो, यासच गुणातीत अवस्था असे म्हणू. अशी गुणातीतता प्राप्त व्यक्ती देहपातानंतर स्वस्वरूपात विलीन होते. परमात्मा होते.

सेवेसाठी निवडलेल्या श्लोकावरील पाचव्या ओवीत श्री ज्ञानेश्वर महाराज म्हणतात,

**एवं वस्तूचिया सत्ता। त्रिगुणाशी पंडुसुता।**
**दाविली सकारणता। आघवीची।।२७५।।**

भक्तहो, या समारोपापर ओवीत माऊलींनी म्हटले आहे की, परमेश्वर सत्तेवर असलेल्या त्रिगुणांची सकारणता याप्रमाणे संपूर्ण दाखवली.

सत्त्व, रज व तम या त्रिगुणांची सूक्ष्म देहात अशी गुंतागुंत असते. सात्त्विक माणूस इहलोकी सात्त्विक आचरणाने सुखासमाधानाने जीवन जगून, दुसऱ्यांनाही उत्क्रांतीच्या मार्गावर मदत करीत असतो. स्वत: उर्ध्व गतीने जाऊन पारमार्थिक उन्नती करून घेतो. अशा व्यक्तीस परमेश्वर स्वत:च सद्बुद्धीची अशी देणगी देतो की जेणेकरून तो स्वस्वरूपास प्राप्त होईल. यास्तव आपण सत्त्वगुणाचा अंगिकार करून त्याचे शुद्ध सत्त्वगुणात रूपांतर करण्याच्या दिशेने वाटचाल केली पाहिजे. दुसरे दोन्ही गुण रज-



तम कमी करण्याचे प्रयत्न करणेही आपल्याच हातात आहे. त्याविषयी आपण सदैव जागृत राहिले पाहिजे. त्यासाठी असे पारायण सप्ताह, प्रवचने, कीर्तने अशा ज्ञानयज्ञांच्या आयोजनाची आज सर्वाधिक आवश्यकता आहे. सर्वांनी त्याचा लाभ घेणेही त्याहून अधिक गरजेचे आहे.

पंचवीस वर्षांपूर्वी ज्यांनी हे 'ज्ञानेश्वरी पारायण' सप्ताहाचे रोपटे लावले, ज्यांनी अविरतपणे ते जोपासले, रौप्यमहोत्सवी वर्षाचा इतका अप्रतिम सोहळा करण्यासाठी ज्यांनी अपार कष्ट घेतले, त्या सर्वांना, शतश:, सहस्त्र: धन्यवाद देऊन म्हणतो,

**बोला पुंडलीक वरदा, हरी विठ्ठल, श्री ज्ञानदेव तुकाराम,**
**श्री गुरूदेव दत्त। माऊली ज्ञानेश्वर महाराज की जय।**
**विठ्ठल, विठ्ठल, विठ्ठल, विठ्ठल, विठ्ठल!**

**। ॐ श्रीहरी ॐ तत सत्।**
**ॐ तत सत्।**
**ॐ तत् सत्।**

(वारणावती, ता. शिराळा, जि. सांगली येथे कम्युनिटी हॉलमध्ये, श्रीमद् गीता ज्ञानेश्वरी पारायण सप्ताहामध्ये २५ व्या/ रौप्यमहोत्सवी वर्षात, दि. ३० ऑगस्ट २००२ रोजी दिलेले हे प्रवचन!)

ooo